दिनांक 23/01/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.163

विषय –विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन गोळा केलेल्या कच-याचे घनकचरा डेपोवर वर्गीकरण करणे, घनकचरा डेपो देखभाल करणे, डेपो वरील विविध मशीन चालवणे व देखभाल करणे, डेपोवर गोळा होणारा कचरा जेसीबी मशीनद्वारे कचरा कंपोस्टींग साईट व लँडफिल साईट वर घेऊन जाणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 20/01/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षणच्या दृष्टीने नगरपरिषद हद्दीमध्ये संकलन केलेल्या कच-यावर दररोज 100% प्रक्रिया होणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन गोळा केलेल्या कच-याचे घनकचरा डेपोवर वर्गीकरण करणे, घनकचरा डेपो देखभाल करणे, डेपो वरील विविध मशीन चालवणे व देखभाल करणे, डेपोवर गोळा होणारा कचरा जेसीबी मशीनद्वारे कचरा कंपोस्टींग साईट व लँडफिल साईट वर घेऊन जाणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मुदत दि.10 फेब्रुवारी 2025 पर्यंत असून त्यापुढे मान्यता न घेतलेस सदरचा खर्च हा नगरपरिषद फंडातुन करावा लागणार आहे.तरी सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेत यावे. याकमी अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मंजुरी घेणे. तसेच निविदा प्रक्रिया राबविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी. सदर कामाची मुदत दि.10 फेब्रुवारी 2025 रोजी संपत आहे. या कामाची पुढील निविदा प्रकिया पुर्ण होईपर्यंत सदर कामास मुदतवाढ देणेत येत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा